आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

गुरुवार दिनांक ३० एप्रिल २०२६

ठळक बातम्या

- प्रहार संघटनेचे प्रमुख बच्चू कडू यांचा शिवसेनेत प्रवेश; विधानपरिषदेसाठी उमेदवारी जाहीर.
- शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार अंबादास दानवे यांना काँग्रेसचा पाठिंबा.
- महाराष्ट्र दिनानिमित्त उद्या नागपुरात मुख्य शासकीय समारंभाचे विभागीय आयुक्त कार्यालयाच्या प्रांगणात आयोजन.
- नागपुरात आज पासून ते ४ मे दरम्यान 'छत्रपती शिवाजी महाराज चषक' राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन.

विधानपरिषद निवडणूक

महाराष्ट्रात राज्य विधानपरिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीतल्या ९ आणि पोटनिवडणुकीतल्या एक अशा दहा जागांसाठी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस आहे. भाजपानं द्वैवार्षिक निवडणुकीसाठी उमेदवारी दिलेल्या सुनील कर्जतकर, माधवी नाईक, संजय भेंडे, विवेक कोल्हे आणि प्रमोद जठार यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत अर्ज भरला. प्रज्ञा सातव यांनीही आज भाजपकडून पोटनिवडणुकीसाठी अर्ज भरला. काँग्रेसच्या आमदार म्हणून त्यांनी राजीनामा दिल्यानं ही जागा रिकामी झाली होती. राष्ट्रवादी काँग्रेसनं माजी आमदार झिशान सिद्दीकी यांना विधानपरिषदेवर संधी दिली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत त्यांनी आज अर्ज भरला. शिवसेनेनं प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांना उमेदवारी जाहीर केली आहे. त्यापूर्वी त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. प्रहार ही सामाजिक संघटना म्हणून कार्यरत राहणार असल्याचं

बच्चू कडू यांनी यावेळी स्पष्ट केलं. शेतकरी, मजूर, वंचित घटक तसंच दिव्यांग बांधव आणि महिलांच्या सक्षमीकरसाठी धनुष्यबाण हाती घेत असल्याची घोषणा त्यांनी केली.

शिवसेनेनं विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांना पुन्हा संधी देण्याचा निर्णय घेतल्याची घोषणा शिंदे यांनी यावेळी वार्ताहरांशी बोलताना केली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं विधान परिषदेतले माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांना पुन्हा संधी दिली आहे. यावर नाराजी व्यक्त करत काँग्रेसनं उमेदवार देण्याची तयारी दर्शवली होती. त्यामुळं काँग्रेस नेत्यांचं मन वळवण्यासाठी उद्धव ठाकरे यांच्या वतीनं खासदार अनिल देसाई, आमदार अनिल परब आणि मिलिंद नार्वेकर यांच्यासह अंबादास दानवे यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधीमंडळ गटनेते विजय वडेट्टीवार, सतेज पाटील यांची मुंबईत गांधी भवनात भेट घेतली. त्यानंतर वेगळा उमेदवार न देण्याचा निर्णय सपकाळ यांनी वार्ताहर परिषदेत जाहीर केला. आगामी सर्व निवडणुका एकत्र लढवण्याचा निर्णय महाविकास आघाडीमध्ये झाल्याचं त्यांनी यावेळी जाहीर केला. त्यामुळं राज्यातली विधान परिषदेची निवडणूक बिनविरोध होणार हे जवळपास स्पष्ट झालं आहे. यावेळी सपकाळ म्हणाले....

जनगणना

जनगणना २०२७ साठी महाराष्ट्रात तयारी वेगाने सुरू असून यंदाची जनगणना प्रथमच पूर्णपणे डिजिटल पद्धतीने होणार आहे. मोबाईल ॲप आणि विशेष वेब पोर्टलच्या माध्यमातून रिअल-टाइम माहिती संकलित केली जाणार असून नागरिकांना 'सेल्फ एन्यूमरेशन'ची सुविधाही उपलब्ध असेल. राज्यात १ मे ते १५ मे २०२६ दरम्यान स्वयं-गणना, तर १६ मे ते १४ जूनदरम्यान घराघरांत जाऊन माहिती संकलन केले जाणार आहे. या मोहिमेसाठी सुमारे २.६४ लाख प्रगणक आणि पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आली असून, डेटा सुरक्षेसाठी त्रिस्तरीय सुरक्षा व्यवस्था लागू करण्यात आली आहे.

विषाणू निदान प्रयोगशाळा

देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून महाराष्ट्रात आधुनिक विषाणू निदान प्रयोगशाळांचे जाळे उभारण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.  यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे राज्यस्तरीय विषाणू प्रयोगशाळा मंजूर करण्यात आली असून इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथेही प्रयोगशाळा उभारण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या निधीतून उभारलेल्या या अत्याधुनिक प्रयोगशाळांनी कोविड-19 काळात आरटी-पीसीआर चाचण्यांद्वारे महत्त्वाची भूमिका बजावली.

फार्मर आयडी

महाराष्ट्र कृषि विभाग यांनी शेतकऱ्यांना २० मे २०२६ पूर्वी फार्मर आयडी नोंदणी पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे. कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ तसेच बियाणे, खते आणि औषधे मिळवण्यासाठी फार्मर आयडी अनिवार्य करण्यात आला आहे. राज्यात आतापर्यंत १ कोटी ३२ लाख  शेतकऱ्यांनी नोंदणी केली असून उर्वरित शेतकऱ्यांनी तातडीने ॲग्रीस्टॅक पोर्टल किंवा सेवा सुविधा केंद्रावर नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. अमरावती आणि  नागपूर विभागासाठी सहाय्यक कृषी अधिकारी अजितकुमार गेजगे यांच्याशी ९६५७७१०९८०९ या क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे.

महाराष्ट्र दिन

महाराष्ट्र राज्याच्या 67 व्या स्थापना दिनानिमित्त मुख्य शासकीय समारंभ नागपूरच्या  विभागीय आयुक्त कार्यालयाच्या प्रांगणात उद्या  सकाळी आठ वाजता आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्र दिनाच्या मुख्य समारंभात प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते राष्ट्रध्वज वंदन होईल. त्यानंतर ते सशस्त्र पोलीस दलाची मानवंदना स्वीकारतील. महाराष्ट्र राज्याच्या 67 व्या स्थापना दिनानिमित्त उद्या सायंकाळी 5:30 वाजता डॉक्टर वसंतराव देशपांडे सभागृह येथे सांस्कृतिक कार्यक्रमचं  आयोजन करण्यात आलं आहे. तर यवतमाळात सकाळी आठ वाजता समता मैदानात जिल्ह्याचे पालकमंत्री तथा मृदा आणि जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज त्यांना आदरांजली वाहण्यात येत आहे. मुंबईत महाराष्ट्र लोकभवन इथं राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी तुकडोजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करुन अभिवादन केलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत वर्षा निवासस्थानी तुकडोजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन वंदन केलं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ इथं राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची ११७ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसरातील त्यांच्या पुतळ्यास प्रकाश महाराज वाघ आणि कुलसचिव डॉ.राजू हिवसे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं.

राज्यस्तरीय कबड्डी

नागपुरात आज पासून ४ मे दरम्यान होणाऱ्या 'छत्रपती शिवाजी महाराज चषक' राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचा उदघाटन सोहळा थोड्याच वेळात कोराडीच्या मैदानावर होणार आहे.हि स्पर्धा क्रीडा क्षेत्रासाठी मैलाचा दगड ठरणार असल्याचे प्रतिपादन चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. नागपूर ग्रामीण कबड्डी असोसिएशन आणि क्रीडा आणि युवक सेवा विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्पर्धेत १६ पुरुष आणि १६ महिला असे एकूण ३२ संघ सहभागी होणार आहेत. या सोहळ्याला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार उपस्थित राहणार आहे.

आयपीएल

आयपीएल क्रिकेट मध्ये आज गुजरात टायटन्स आणि रॉयल चैलेंजर्स बेंगळुरू यांच्यात सामना होणार आहे. हा सामना अहमदाबादमध्ये संध्याकाळी साडेसात वाजता सुरु होईल.

हवामान

विदर्भात आज ४४ अंश सेल्सिअस सह चंद्रपूर जिल्हा सर्वात उष्ण ठरला, तर नागपुरात आज ४३ अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली आहे.

सूचना

महत्वाची सूचना - आकाशवाणी नागपूर केंद्राच्या **585** किलो हर्ट्स आणि विविध भारती नागपूर केंद्राच्या शंभर पूर्णांक सहा मेगाहर्टसवरून दररोज सायंकाळी ६ वाजता प्रसारित होणारे प्रादेशिक बातमीपत्र उद्यापासून सहा वाजून पाच मिनिटांनी प्रसारित होईल. त्याचप्रमाणे विविध भारतीच्या नागपूर केंद्रावरून सायंकाळी सहा वाजून **15** मिनिटांनी प्रसारित होणाऱ्या ठळक बातम्या उद्यापासून सायंकाळी सहा वाजून **58** मिनिटांनी प्रसारित केल्या जातील.

टँकरद्वारे पाणीपुरवठा

भंडारा जिल्ह्यातील मोहाडी नगर पंचायतीला ३५ कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजना मंजूर होऊनही शहरातील अनेक भागांत नियमित पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. पाणीटंचाईमुळे महिलांना दूरवरून पाणी आणावे लागत असून, सामाजिक कार्यकर्त्यांकडून टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे.

पक्षांसाठी पाणी

उन्हाचा कडाका सर्वत्र वाढत आहे. उन्हाच्या झळा प्राणी पक्षांनाही जाणवू लागल्या आहे. बुलढाणा जिल्ह्यातील कदमापूर येथील जिल्हा परिषद शाळेतील उपक्रमशील शिक्षक राजेश कोगदे आणि त्यांच्या विद्यार्थ्यांनी खामगाव ते बुलढाणा रोडवरील विविध झाडांवर पक्षांसाठी पाण्याची भांडी आणि घरटी लावली आहे. बुलढाणा जिल्ह्यातील ज्ञानगंगा अभयारण्याकडे जाणाऱ्या प्रत्येक वाहनधारकाला या विद्यार्थ्यांकडून पाण्याची बाटली मोफत देऊन वाटेत असणाऱ्या या भांड्यांमध्ये पक्षांसाठी पाणी टाकण्याचं आवाहन केलं जात आहे.

*****